जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४५५ दिनांक - २२/०६/२०२३**

चंदननगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## सायबर फसवणुक करणा-या आरोपीला मेहसाणा गुजरात मधुन केले जेरबंद

तक्रारदार यांना अज्ञात मोबाईल धारक यांनी शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास चांगला परतावा मिळवून देतो असे सांगुन सुरूवातीला तक्रारदार यांच्या कडुन मोठ्या प्रमाणावर पैसे प्राप्त करुन शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक करुन प्रॉफिट मिळवुन देऊन,विश्वास संपादन करुन आरोपी यांनी त्यांचे फिनो बँक,येस बँक या बँकेच्या अकाउंट वर अनुक्रमे २१,८१,६६१/- रुपये व १,००,०००/- रुपये प्राप्त करुन सदर अकाउंट वर भरलेल्या पैशा बाबत काही एक प्रतिसाद व मोबदला न देता एकुण २२,८१,६६१/- रूपये आर्थिक फसवणुक केले बाबत चंदननगर पोलिस स्टेशन गु.रं.नं.२२३/२०२३ भा.द.वि.कलम ४०९,४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान कायदा कलम ६६(क),६६(ड)प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हाचे अनुषंगाने तक्रारदार यांचे फसवणुक झालेल्या पैशा बाबत तसेच बँक खाते धारका बाबत माहिती घेतली असता.सदरचा बँक खातेदार तसेच मोबाईल चे लोकेशन हे वडनगर,गुजरात या राज्यातील असल्याचे समजुन आले.सदर बँक खात्याला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांक व जीमेल आयडी ची माहिती घेतली असता सदरचे मोबाईल लोकेशन व जीमेलच्या आयपी ऍड्रेस वरून प्राप्त झालेल्या क्रमांकाचे लोकेशन हे गुजरात राज्या मधील वडनगर,खेरूला जिल्हा मेहसाणा गुजरात येथील असल्याचे समजुन आले.सदर ठिकाणी चंदननगर पोलिस स्टेशन येथील सायबर पथकाचे पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर रेवले पो.हवा भरत उकिरडे पो.अमंलदार संतोष शिंदे असे तपास कामी जाऊन प्राप्त मोबाईल क्रमांकाचे लोकेशन नुसार खेरूला पोलिस स्टेशन जिल्हा मेहसाणा गुजरात येथील स्थानिक पोलिसांची मदत घेऊन फसवणुक करणाऱ्या मोबाईल धारक इसम नामे नवीन प्रवीणभाई चौहाण वय २२ वर्ष रा.गोरिसाणा ता.खेरालु जिल्हा मेहसाणा गुजराथ याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता आजुबाजुच्या गावातील त्याचे मित्र सदर गुन्हयांमध्ये सहभागी असल्याचे समजून आल्याने वडनगर पोलिस यांच्या मदतीने सिपोर,शहापूर,शहापूर वड,खानपुर,छबलिया या गावी जाऊन शोध घेतला असता आरोपीला सुगावा लागल्याने ते सदर ठिकाणी पोहोचण्यापुर्वीच पळुन गेले ताब्यातील आरोपीला पोलिस स्टेशन मध्ये घेऊन येऊन त्याच्याकडे चौकाशी करुन सदर गुन्हयामध्ये त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला नमुद गुन्हयात खेरालू पोलिस स्टेशन दक्षिण जिल्हा मेहसाणा गुजरात येथे दिनांक १३/०६/२०२३ रोजी अटक करुन दिनांक १४/०६/२०२३ रोजी ट्रांजिस्ट रिमांड करता खेरालु प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी जिल्हा मेहसाणा गुजरात येथे सादर करुन मा.कोर्टा कडुन त्याची १ दिवसांची ट्रांजिस्ट रिमांड मंजुर केली.

रु

अटक आरोपीस दिनांक १५/०६/२०२३ रोजी मा.शिवाजीनगर न्यायालय कोर्ट क्र ०५ येथे सादर केले असता मा.न्यायालयाने त्याची दिनांक २१/०६/२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी मंजुर केली.पोलीस कस्टडी मध्ये असताना आरोपीने त्यांचे तीन साथीदार यांच्या सोबत मिळुन अनेक लोकांना ऑनलाईन ट्रेडिंग च्या नावाने फसवणुक केल्याचे सांगितले.अनेक राज्यतील पोलीस शोधण्यासाठी आलेली होती.बाहेर राज्यातील पोलिसांनी अनेक वेळा ड्रोन कॅमेराच्ये माध्यमातुन देखील शोधण्याचा प्रयत्न केला परंतु कोणत्याच राज्यातील पोलिसांना मिळुन आले नाही.ऑनलाइन फसवणुक करिता वेगवेगळया ठिकाणाहुन सिम कार्ड त्रयस्थ व्यक्ती कडुन खरेदी केले जातात स्वतःच्या नावाची सिमकार्ड तसेच बँकेचे

अकाउंट नंबर कोणीही फसवणुक करिता वापरत नसल्याचे सांगितले.पोलिसांना मिळुन न येण्या करिता दर काही दिवसांनी फसवणुकीची जागा बदलत असल्याचे सांगितले फसवणुकी मधुन प्राप्त पैशातुन महागडया वस्तु, गाडया व पिकनिकच्या ठिकाणी मौज मज्या करत असल्याचे सांगितले.

सदरची कामगिरी मा.पोलिस उप आयुक्त परि ४ पुणे शहर श्री.शशीकांत बोरटे मा.सहाय्यक पोलिस आयुक्त येरवडा विभाग पुणे शहर श्री.किशोर जाधव वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंदननगर पोलिस स्टेशन श्री.राजेंद्र लांडगे पोलिस निरीक्षक (गुन्हे) जगन्नाथ जानकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर रेवले पो.हवा भरत उकिरडे पो.अमंलदार संतोष शिंदे महिला पो.अमंलदार मेमाणे,डहाळे यांनी केली आहे.